# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग, तिसरा मजला, परळ,मुंबई - 400 012.
Email Id: phdmcgm@gmail.com

**क्र. आअ/ 018203/ प दि. 15 /09/2023**

प्रति,

श्री. कमलाकर र. शेणॉय
बी- 3, वैशाली अपार्टमेंट,
एम.टी.एन.एल. समोर,शेठ मोतीशा (लव) लेन,
माझगाव, मुंबई - 400 010.

**विषय:** **Trucks carring on illegal Food and other Business on Road Without any policy Decided.**

संदर्भ: 1) क्र. उपआयुक्त/विशेष/MAIL/17 दि.01.08.2023

2) क्र. अअ/10196/DMC/अति. निर्मु दि.11.08.2023

उपरोक्त संदर्भित विषयाचा अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

1. बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत अस्थीर ठिकाणांवर कोणतेही अनुज्ञापन देण्यात येत नाही.

2. फुड ट्रक बाबत महानगरपालिकेच्या / शासकीय जागेवर व्यवसाय करण्याबाबतचे धोरण निश्चित झालेले असुन ते पुढील काळात अंमलात येईल.

3. खाजगी जागेवर फुड ट्रक व्यवसाय करण्याबाबतचे धोरण ठरत असुन ते पुढील काही महिन्यात निश्चित होणार आहे.

4. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्त्यावरील अनधिकृत व्यवसाय करणा-यांवार कार्यवाही अनुज्ञापन खात्याच्या अतिक्रमण निर्मुलन विभागा मार्फत करण्यात येते.

5. सदर कार्यवाही दरम्यान अन्न पदार्थ विक्रेत्यांवर आरोग्य खाते व अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत संयुक्त कार्यवाही करण्यात येते.

6. बृहन्मुंबई महानगरपालिकामार्फत आरोग्य परवाना नुतनीकरणासाठी परवाना शुल्क व कचरा निर्मूलन आकार (TRC) आकारण्यात येते. सन 2008 पासुन परवाना शुल्कात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. परंतू, कचरा निर्मूलन

आकार (TRC) 10% वाढ प्रत्येक वर्षी धोरणानुसार केली जाते. कचरा निर्मूलन आकार (TRC) वर निर्णय घेण्याची बाब हि घन कचरा खात्याच्या अखत्यारीत येते.

7. अनुज्ञापन नुतनीकरण करण्यासाठी होणा-या विलंबास परवाना शुल्कानुसार विलंब शुल्क पुढील प्रमाणे कारण्यात येते.

| **विलंब कालावधी** | **परावाना शुल्कावरील दंड** |
|---|---|
| नुतनीकरण दिनांकापासुन पुढील 3 महिन्याचा कालावधीकरिता | परावाना शुल्काच्या 25 % दंड |
| नुतनीकरण दिनांकापासुन पुढील 6 महिन्याचा कालावधीकरिता | परावाना शुल्काच्या 50 % दंड |
| नुतनीकरण दिनांकापासुन पुढील 9 महिन्याचा कालावधीकरिता | परावाना शुल्काच्या 75 % दंड |
| नुतनीकरण दिनांकापासुन पुढील 12 महिन्याचा कालावधीकरिता | परावाना शुल्काच्या 100 % दंड |

त्यानुसार 12 महिन्याचा पुढील कालावधीकरिता 3 महिन्यांप्रमाणे विलंब शुल्कासह दंड आकारला जातो.

8. आपल्या पत्रात नमुद "Not providing potable water by charging for potable water" व "Increasing Water Tax" ही बाब सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबधित नसुन कार्यकारी अभियंता (जलकामे) या खात्याशी संबधित आहे. सदर बाबत आपण संबधित खात्याशी संपर्क साधावा.

आपल्या माहितीकरिता.

15/9/23

डॉ. भुपेंद्र पाटील
**सहाय्यक आरोग्य अधिकारी**
**(अनुज्ञापन)**